
**नवी मुंबई महानगरपालिका** | **Navi Mumbai Municipal Corporation**

कार्यालय: नमुंमपा मुख्यालय, भुखंड क्र.१, किल्ले गांवठाण जवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५ए, सीबीडी बेलापुर , नवी मुंबई-४०० ६१४
दुरध्वनी क्र.: २७५६७०७०/७१/७२/८१

Head Office: Plot No.1, Near Kille Gaothan,Palmbeach Junction, Sector 15A, C.B.D. Belapur
Navi Mumbai - 400614
Tel.: 2756 7070/ 71/72/81

Email id :- 1) dmc_admin@nmmc.gov.in 2) commissioner@nmmc.gov.in


जाहिरात क्रमांक आस्था/०४/२०२५, दिनांक :-१३/१२/२०२५.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क मधील विविध संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रस्तुत जाहिरातीमधील पदे ही तांत्रिक सेवेतील आहेत. सदर भरतीसाठी पुरेसा प्रतिसाद प्राप्त होण्याकरीता जाहिरात देण्यात येत आहे. सदर जाहिरातीनूसार गट-क मधील एकूण १२ पदांकरीता अर्ज करण्याचा कालावधी दिनांक ०५/०१/२०२६ पासून ते दिनांक ०४/०२/२०२६ रोजी पर्यंत आहे. इच्छुक उमेदवारांनी www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/०२/२०२६ या दिवशी रात्री ११.५५ वाजेपर्यंत Online पद्धतीने अर्ज करावेत. प्रस्तुत जाहिरातीच्या अनुषंगाने रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **गट** | **संवर्ग** | **७ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी** | | **भरावयाची आवश्यक पदे** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वेतनस्तर** | **वेतनश्रेणी** | |
| १ | क | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०८ |
| २ | क | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | एस-१४ | ३८६००-१२२८०० | ०४ |
| | | | | **एकुण** | **१२ पदे** |

**ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| **१** | ऑनलाईन पद्धतीने अर्ज नोंदणी सुरु होण्याचा दिनांक | दि. ०५/०१/२०२६ |
| **२** | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि.०४/०२/२०२६, वेळ रात्री ११.५५ पर्यत |
| **३** | ऑनलाइन पद्धतीने परीक्षा शुल्क भरणेची अंतिम मुदत | दि. ०४/०२/२०२६ |
| **४** | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | परीक्षेच्या ७ दिवस आधी |
| **५** | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक (प्रवेश पत्रात नमूद केल्यानुसार) | नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. |

* परीक्षा शुल्क :-

| आकारण्यात येणारे शुल्क | |
|---|---|
| **खुला प्रवर्ग** | **मागासवर्गीय, अनाथ, दिव्यांग, आर्थिक दुर्बल घटक** |
| ₹१,०००/- | ₹९००/- |

*** परीक्षेचा दिनांक, वेळ व केंद्र प्रवेशपत्रामध्ये नमूद केले जाईल.**

*** संभाव्य बदलाबाबत वेळोवेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द केली जाईल.**

ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत इत्यादी बाबतचा तपशील व ऑनलाईन अर्ज करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर भेट देण्यात यावी. तसेच संवर्गनिहाय भरावयाची पदे, पदांचा तपशील, वेतनश्रेणी, वयोमर्यादा/वयोमर्यादा शिथिलता, निवड पद्धत, सर्व साधारण सूचना, अटी व शर्ती, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण तसेच आरक्षणाबाबत तरतूदी, पदनिहाय ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा शुल्क, अर्ज भरणेबाबत मार्गदर्शक सूचना इत्यादी बाबतचा तपशील www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**(डॉ.कैलास शिंदे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**स्थळ :- सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**
**दिनाक :- १३/१२/२०२५.**

**पदनाम, पदसंख्या, आरक्षण तपशील, पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव व वेतनश्रेणी तपशील :-**

**१. पदनाम :- कनिष्ठ अभियंता (विद्युत) Junior Engineer (Electrical) (गट-क)**

**एस-१४ (३८६००-१२२८००)**

| जात प्रवर्ग | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि.जा. (अ) ३% | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५% | भ.ज. (ड) २% | वि.मा .प्र. २% | इ.मा. व. १९% | सा.शै. मा.व. १०% | आ.दु.घ. (EWS) १०% | खुला (अराखीव) २८% | एकुण पदे १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ०१ | - | ०१ | - | - | - | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०८ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | - | ०१ | - | - | - | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ |
| महिला (३०%) | - | - | - | - | - | - | | ०१ | - | - | - | ०१ |
| माजी सैनिक (१५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन (१०%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू (५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त (५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भुकंपग्रस्त (२%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ (१%) | - | | | | | | | | | | | |
| **दिव्यांग (४%)** | - | | | | | | | | | | | |

**<u>शैक्षणिक अर्हता</u> :-**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत (Electrical) अभियांत्रिकी शाखेची पदवी.

ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**२. पदनाम :- कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) Junior Engineer (Mechanical) (गट-क)**

**एस-१४ (३८६००-१२२८००)**

| जात प्रवर्ग | अ. जा. १३% | अ. ज. ७% | वि.जा. (अ) ३% | भ.ज. (ब) २.५% | भ.ज. (क) ३.५% | भ.ज. (ड) २% | वि.मा .प्र. २% | इ.मा. व. १९% | सा.शै. मा.व. १०% | आ.दु.घ. (EWS) १०% | खुला (अराखीव) २८% | एकुण पदे १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०१ | - | - | - | ०४ |
| **रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे.** | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | - | ०१ | - | - | - | ०४ |
| महिला (३०%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| माजी सैनिक (१५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अंशकालीन (१०%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| खेळाडू (५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| प्रकल्पग्रस्त (५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| भुकंपग्रस्त (२%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| अनाथ (१%) | - | | | | | | | | | | | |
| **दिव्यांग (४%)** | - | | | | | | | | | | | |

**<u>शैक्षणिक अर्हता</u> :-**

अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी (Mechanical) अभियांत्रिकी शाखेची पदवी.

ब) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**सर्वसाधारण सूचना**

१. **वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणांमध्ये वाढ, घट अथवा बदल होण्याची शक्यता आहे.**

२. उपरोक्त नमूद संवर्गातील पदासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यापुर्वी उमेदवारांनी स्वत: खात्री करावयाची आहे की, ते अर्ज करीत असलेल्या पदासाठी विहीत अर्हता/अटींची पूर्तता करीत असून सदर पदाकरिता ते पात्र आहेत.

३. **ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठी उमेदवाराकडे नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी (Mobile No.) असणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिया परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच इतर माहिती वेळोवेळी ऑनलाईन पद्धतीने देण्यात येणार असल्याने, भरती प्रक्रियेच्या पूर्ण कालावधीमध्ये सदर ई-मेल आयडी वैध राहणे आवश्यक आहे.

४. अराखीव (खुला) पदांकरिता सर्व उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांचा (मागासवर्ग उमेदवारांसह) विचार केला जात असल्याने सर्व उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ जात प्रवर्गाची माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

५. संबंधित पदाच्या/परीक्षेच्या जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता ग्राह्य धरली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

६. अर्ज सादर केलेल्या उमेदवारास प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी संबंधित पदाची आवश्यक शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारांस निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

७. महिला उमदेवारांनी त्यांच्या नावामध्ये काही बदल असल्यास (लग्नापुर्वीच नाव व लग्नानंतरचे नाव) त्यासंदर्भात आवश्यक कागदपत्रे जसे विवाह नोंदणी दाखला, राजपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.

८. पत्रव्यवहारासाठी स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्यचे लिहावा. व्यावसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र / वर्ग अथवा तत्सम स्वरुपाच्या कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

९. अर्जामध्ये दिलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणी दरम्यान काही कागदपत्रे संशयास्पद वाटली अथवा सादर केलेल्या कागदपत्रांतील माहिती व मूळ अर्जातील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामध्ये भरलेली माहिती खोटी आहे असे समजण्यात येईल. आवश्यकतेनुसार मुळ शैक्षणिक / इतर कागदपत्रांची संबंधीत शैक्षणिक विद्यापीठ / संस्था यांच्याकडे तपासणी करण्यात येईल. तसेच उमेदवार अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करू न शकल्यास उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१०. वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता व ज्या दिव्यांग उमेदवारास मदतनीस घ्यावयाचा आहे इत्यादी बाबत न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधीत दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

११. ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ.कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी देखील स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणा-या उमेदवारांनी स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.

१२. प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांकास संबंधित शैक्षणिक अर्हता/ अनुभव धारण करणे आवश्यक आहे.

१३. अनुभवाच्या कालावधीची गणना प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापुर्वी पुर्ण केलेला असावा.

१४. प्राप्त अर्जाच्या संख्येचा विचार करुन निवड प्रक्रियेचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त व मा.निवड समिती यांना राहील.

१५. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.

१६. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आला असला, तरी संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. संक्षिप्तपणे (Abbreviations) वा अद्याक्षरे (Initials) न देता संपुर्ण नाव व संपुर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एक स्पेसने जागा सोडावी.

१७. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रांवरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रावरील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील विहीत प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

१८. उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, अर्हतेमध्ये नमुद केलेले विहीत शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्र, मराठी व इंग्रजी भाषेचे विहीत गतीचे टंकलेखनाचे प्रमाणपत्र व संगणक ज्ञानाचे एमएससीआयटी प्रमाणपत्र तसेच मागासवर्ग उमेदवारांनी सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, आणि अ.जा.व अ.ज.प्रवर्ग वगळता अन्य सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र, इत्यादी सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती, तसेच उमेदवाराची समांतर आरक्षणांतर्गत निवड झाली असल्यास, शासन निर्णयानुसार विहीत प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती सादर करणे आवश्यक असेल.

१९. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / सूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पुर्ण होईल.

**२०. सदरची परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे.**

२. <u>वयोमर्यादा</u> :-

दि.०१/१२/२०२५ या दिनांकास उमेदवार खालील नमूद केलेल्या विहीत वयोमर्यादेतील असावा.

अ) अराखीव (खुला) प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे

ब) मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी - किमान १८ वर्षे व कमाल ४३ वर्षे

क) नवी मुंबई महानगरपालिकेच्या नियमीत आस्थापनेवर कार्यरत असलेले मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५० वर्षे मर्यादेपर्यंत व खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४५ वर्षे मर्यादेपर्यंत अशी वयोमर्यादा शिथील.

ड) नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवर करार पध्दतीवर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना वयोमर्यादा शिथील.

| | |
|---|---|
| २.१ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन क्र. एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या १२, दि. २५/०४/२०१६ नूसार सद्यस्थितीत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी आहे. |
| २.२ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९८/प्र.क्र.३९/९८/१६-अ, दि.१६/०६/२००१ मधील तरतुदीनुसार दिव्यांग व्यक्तींना उच्चतम वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.३ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शुद्धीपत्रक क्र. मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०/०८/२०१० प्रमाणे दिव्यांग माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सवलतीच्या अनुषंगाने वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.४ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शुद्धीपत्रक क्र.मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि. २०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. |
| २.५ | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक विकाक २२१५/प्र.क्र.३३७/१६-अ, दिनांक ०४/११/२०१६ नूसार प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. |
| २.६ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अशंका-१९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दि.०२/०१/२०१९ नुसार पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी निश्चित करण्यात आलेली ४६ वर्षे ही वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी शिथील करण्यात आलेली आहे. |
| २.७ | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्यांसाठीचे वय ४५ वर्षे इतके राहील. |
| २.८ | महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |
| २.९ | उन्नत व प्रगत गटात मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र, इमाव प्रवर्गामधील उमेदवार मागासवर्गीयांसाठी असलेले वय, परीक्षा शुल्क सवलत अथवा अन्य कोणत्याही सवलतीस पात्र नाहीत. |

| किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा | | प्राविण्य प्राप्त खेळाडू कमाल वयोमर्यादा (खुला प्रवर्ग व मागासवर्गीय) | माजी सैनिक कमाल वयोमर्यादा | | दिव्यांग व्यक्ती उमेदवार कमाल वयोमर्यादा | पदवीधर अंशकालीन उमेदवार कमाल वयोमर्यादा | प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व उमेदवारांसाठी | खुला प्रवर्ग | मागासवर्गीय व अनाथ उमेदवार | | खुला प्रवर्ग | मागास वर्गीय | | | |
| १८ | ३८ | ४३ | ४३ | सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे | सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे | ४५ | ५५ | ४५ |

*** उपरोक्त नमूद वयोमर्यादा ही दि.०१/१२/२०२५ या दिनांकास विचारात घेतली जाईल.**

## ३. पदसंख्या व आरक्षणांसंदर्भात सर्वसाधारण तरतूदी :-

| | |
|---|---|
| **३.१** | भरावयाच्या उपरोक्त संवर्ग पदांचे सामाजिक/समांतर आरक्षण तसेच वर नमूद केलेली पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. |
| **३.२** | पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती/बदल वेळोवेळी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. |
| **३.३** | महिला, खेळाडू, दिव्यांग, अनाथ, माजी सैनिक, भूकंपग्रस्त, अंशकालीन, प्रकल्प्रगस्त यांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमत केलेल्या आदेशानुसार राहील. |
| **३.४** | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.महिला २०२२/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये खुला प्रवर्ग तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| **३.५** | वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), व भ.ज.(ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गाच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. |
| **३.६** | समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३८/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ३.७ | सदर जाहिरात सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग अधिनियम दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ व संबंधित शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येतील. |
| ३.८ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५ दिनांक २८ जून, २०२४ अन्वये विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ३.९ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६/-अ, दि.१२/०२/२०१९ व दि.३१/०५/२०२१ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसर कार्यवाही करण्यात येईल. तसेच प्रस्तुत संवर्गाकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवारांनी सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे परंतु अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. |
| ३.१० | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सत्यता पडताळणीबाबत, महाराष्ट्र शासन, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२९७/मावक दि.२६/०४/२०२२ मधील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात येईल. सदर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याच्या (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी केल्यानंतर त्यांची नियुक्ती करण्यात येईल. |
| ३.११ | अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारसीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे. |
| ३.१२ | जातीच्या दाव्याच्या पृष्ट्यर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० मधील तरतुदीनूसार सक्षम प्राधिकारी यांचे कडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| ३.१३ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा-या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| ३.१४ | शासन शुध्दीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग, क्रमांक:संकीर्ण -२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार संबंधित उमेदवार उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात येईल. प्रस्तुत संवर्गाकरीता सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे उन्नत व प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. |
| ३.१५ | सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| ३.१६ | कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल. |
| ३.१७ | कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल. |
| ३.१८ | सामाजिक व समांतर आरक्षासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ४ | **<u>दिव्यांग आरक्षण</u> :-**<br>१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.<br>२. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.<br>• FUNCTIONAL REQUIREMENT ABBREVIATIONS USED : S-Sitting, W- Walking, BN- Bending, L-Lifting, KC- Kneeling & Crouching, JU-Jumping, CRL-Crawling, CL-Climbing, PP-Pulling & Pushing, MF-Manipulation with Fingers, RW-Reading &Writing, SE-Seeing, H-Hearing, C-Communication<br>• CATEGORY ABBREVIATIONS USED : LV=Low Vision, D=Deaf, HH= Hard of Hearing, OL=One Leg, LC=Leprosy Cured, Dw =Dwarfism, AAV=Acid Attack Victims, SLD= Specific Learning Disability. |
| ४.१ | दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. |
| ४.२ | दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल. |
| ४.३ | दिव्यांग व्यक्तीसाठी असलेली पदे एकूण भरावयाच्या पदसंख्येच्या ४% असतील. |
| ४.४ | संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्रधारक उमेदवार/व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी/सवलतीसाठी पात्र असतील. |
| ४.५ | लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार/व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील :-<br>(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती लागू राहतील.<br>(२) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी सवलती. |
| ४.६ | लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकाराचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार क्रेंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. |
| ४.७ | शासन परिपत्रक, दिव्यांग कल्याण विभाग, क्रमांक:दिव्यांग -२०२४/प्र.क्र.८६/दि.क.२, दिनांक २७ जून, २०२४ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये / भविष्यात वेळोवेळी स्थापन करण्यात आलेल्या / येणा-या वैद्यकीय मंडळामार्फत दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID Card) प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. |
| ४.८ | लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या उमेदवारांना अर्जामध्ये नमूद केलेला दिव्यांगत्वाचा प्रकार/उप प्रकार बदलणे अनुज्ञेय नाही. |
| ४.९ | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए १०८२/३५०२/सीआर-१००/१६-अ, दि.०२ सप्टेंबर १९८३ अन्वये<br>अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदांवर भरती करताना युद्ध काळात आणि युद्ध नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास असा माजी सैनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्यक्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.<br>आ) युद्ध काळात किंवा युद्ध नसताना सैनिक सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य असलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील फक्त एका व्यक्तीला त्या नंतरच्या पसंती क्रमाने १५ टक्के आरक्षित पदांपैकी उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील. तथापि, सदर उमेदवाराने पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे. |

**५. <u>खेळाडू आरक्षण</u> :-**

| | |
|---|---|
| ५.१ | शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुद्धीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, तसेच शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच त्यांचे वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ५.२ | प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहीत अर्हता धारण करीत असल्याबाबत तसेच, उमेदवार कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयी संबंधित विभागीय क्रिडा उपसंचालक यांनी प्रमाणपत्र प्रदान केलेला विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल (शासन निर्णय, दिनांक ०१ जुलै, २०१६ सोबतचे परिशिष्ट "क") अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा असणे तसेच, सदर पडताळणी अहवाल अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. |
| ५.३ | विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल उपलब्ध नसलेल्या उमेदवारांच्या बाबतीत खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करणे तसेच, सक्षम प्राधिका-याकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोच पावती अर्जासोबत अपलोड करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. |
| ५.४ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा किंवा तत्पूर्वीचा विभागीय क्रीडा उपसंचालक यांची विहित नमुन्यातील प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी अहवाल सादर केला नसल्यास अथवा विहित दिनांकापूर्वी सक्षम प्राधिकरणाकडे क्रिडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास, संबंधित उमेदवाराचा खेळाडू आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नांही. |
| ५.५ | प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर केलेल्या अर्जाची पोच पावती अपलोड केलेल्या उमेदवाराने कागदपत्रे पडताळणी / मुलाखतीच्या वेळी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत आणि खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या संबधित विभागीय क्रीडा उपसंचालक यांनी प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतचा अहवाल सादर केला तरच, उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर निवडीकरीता विचार करण्यात येईल. |
| ५.६ | एकापेक्षा जास्त खेळांची प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. |

## ६.<u>अनाथ आरक्षण</u> :-

| | |
|---|---|
| ६.१ | अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक:अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ नुसार शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील. |
| ६.२ | अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरकपत्र क्रमांक: अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| ६.३ | अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६.४ | प्रस्तुत पदासाठी अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणा-या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही. |
| ६.५ | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-अनाथ२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि.२० ऑगस्ट, २०१९ अन्वये अनाथ संवर्गामधील उमेदवारांना मागासवर्गीय प्रमाणे वय व फी मध्ये सवलत देण्यात येईल. |

## ७. <u>निवड पध्दत</u> :-

| | |
|---|---|
| ७.१ | जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या परीक्षा घेणे सोयीस्कर नसल्यास परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता / अनुभव किंवा अन्य योग्य निकष यांच्या आधारे निकष निश्चित करुन अंतिम परीक्षेस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. |
| ७.२ | परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेणेत येईल. परीक्षेचे ठिकाण, दिनांक व वेळ ई-मेल किंवा एस.एम.एस. (SMS) द्वारे संबंधित उमेदवारांना कळविण्यांत येईल. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmc.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ७.३ | जाहिरातीमध्ये नमुद पदास आवश्यक असलेली अर्हता अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. |
| ७.४ | जाहिरातीमधील नमुद पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |
| ७.५ | परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmc.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ७.६ | सरळसेवा भरतीकरिता घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची / उत्तरपुस्तिकांची गुणपडताळणी अथवा फेर तपासणी केली जाणार नाही. अथवा या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ७.७ | उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक क्षमता किती आहे ते आजमावणेकरिता परीक्षेच्या वेळी विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नांबरोबर ज्या पदासाठी अर्ज केलेला असेल, त्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली असेल त्या क्षेत्रातील अद्ययावत घडामोडी व त्याला असलेली माहिती आणि जनतेच्या समस्या या सबंधीचे प्रश्न यांचाही समावेश असेल. |
| ७.८ | पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणीसाठी पाचारण करण्यात येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmc.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच उमदेवाराच्या ई-मेल अथवा मोबाईलवर एसएमएसद्वारे (sms) कळविण्यांत येईल. |

| | |
|---|---|
| ७.९ | निवडसूची ही प्रवर्ग निहाय तयार करण्यात येईल व त्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या पुढीलप्रमाणे असेल. |

| प्रवर्गनिहाय रिक्त पदांची संख्या | निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या |
|---|---|
| १ | ३ |
| २ ते ४ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या १०० टक्के किंवा ५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५ ते ९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ५० टक्के किंवा १० यापैकी जे अधिक असेल ते. |
| १० ते ४९ | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या ३० टक्के किंवा १५ यापैकी जे अधिक असेल ते. |
| ५० किंवा याहून अधिक | रिक्त पदे अधिक रिक्त पदांच्या २५ टक्के |

वरील प्रमाणे अतिरिक्त उमेदवारांच्या संख्येची परिगणना करताना उमेदवारांची संख्या अपूर्णांकात येत असल्यास पुढील पूर्णांक संख्या विचारात घेण्यात येईल.

| | |
|---|---|
| ७.१० | कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त दाखला, भुकंपग्रस्त दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र, खेळाडूचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र, अनाथ असल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वस्वाक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरीता अपुर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| ७.११ | कागदपत्रे तपासणीनंतर निवडयादी व प्रतिक्षायादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmc.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ७.१२ | प्रमाणपत्र तपासणीकरीता येतेवेळी अर्जासोबत जोडलेल्या दस्तऐवजांच्या मूळ प्रती व त्याची स्वसाक्षांकित (Self Attested) छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेल्या ओळखीचा पुरावा व स्वत:चे आधार कार्ड / पॅन कार्ड / निवडणूक आयोगाचे ओळखपत्र / पासपोर्ट / पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची स्वसाक्षांकित प्रत (Self Attested) सोबत आणणे अनिवार्य आहे. |
| ७.१३ | पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला त्याने रजिस्टर्ड केलेल्या ई-मेल व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे (SMS) किंवा ई-मेल (E-mail) द्वारे निवडसूची / प्रतिक्षा यादी व नियुक्ती बाबत कळविण्यांत येईल. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ७.१४ | नोंदणी प्रक्रियेनंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्यासाठी एक लिंक विकसित केली जाते. एकदा नवी मुंबई महानगरपालिकेद्वारे लिंक होस्ट केल्यानंतर, उमेदवाराला ई-मेल व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे (sms) द्वारे त्याबाबत सूचित केले जाईल. उमेदवार थेट लिंकवरुन त्याचे प्रवेशपत्र डाऊनलोड करु शकतात. प्रवेशपत्राबाबत कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. |
| ७.१५ | निवड समितीने तयार केलेली निवडसूची २ वर्षासाठी किंवा नवीन सूची तयार करण्यासाठी सेवाभरतीची जाहिरात देण्यात येईल, त्या दिनांकापर्यंत यापैकी जो दिनांक आधी घडेल, त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. तसेच ही मुदतवाढ निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत, त्या पदांपुरतीच असेल. त्यानंतर ही निवडसूची आपोआप व्यपगत होईल. |

## ८. समान गुण धारण करणा-या उमेदवारांची प्राधान्य क्रमवारी.

| | |
|---|---|
| ८.१ | अ) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| ८.२ | ब) समान गुणप्राप्त उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसेल अथवा वरील अनु.क्र. (अ) नुसार एकापेक्षा अधिक उमेदवार समान गुणप्राप्त करीत असतील तर त्यापैकी वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| ८.३ | क) वरील अनु.क्र. (८.१) व (८.२) या दोन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवी, पदवी, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| ८.४ | वरील अनु.क्र. (८.१), (८.२) व (८.३) या तिन्ही अटींमध्ये देखील समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |
| ८.५ | सेवा प्रवेश नियम / जाहिरात / अधिसुचनेमध्ये अनुभव विहित केला असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास धारण करीत असलेल्या विहीत अनुभवाचा कालावधी विचारात घेण्यात येईल. |
| ८.६ | वरील निकष लागूनही उमेदवारांचा गुणानुक्रम समान येत असल्यास अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम त्यांच्या इंग्रजीमधील आडनावाच्या आद्याक्षरानुसार निश्चित करण्यात येईल. |
| टीप :- | आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. एससीवाय १२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३/०१/२००६ अन्वये गठीत करण्यास आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटूंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटूंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी) होय. |

## ९.अर्ज, अर्हता इत्यादी :-

| | |
|---|---|
| ९.१ | नवी मुंबई महानगरपालिकेच्या (www.nmmc.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरलेल्या अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या अंतिम दिनांक व वेळेनंतर अर्ज करण्याची कार्यप्रणाली बंद होईल. अन्य प्रकारे अर्ज करू नयेत. |
| ९.२ | महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नाव, जाहिरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतिम दिनांक इ. तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आाक्षेप असल्यास, अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत तसे मा. महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना परस्पर कळविणेची विनंती आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना करावी. |

## १०. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-

| | |
|---|---|
| १०.१ | उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी www.nmmc.gov.in या वेबसाईटवर जाऊन जाहिरात सविस्तर अभ्यासावी व नंतरच आपला अर्ज भरावा. |
| १०.२ | जाहिराती मधील बाबीसंबंधी, काही विचारणा करावयाची असल्यास नवी मुंबई महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाच्या ०२२-२७५६७१८९ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. |
| १०.३ | **ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**<br>उमेदवारास ऑनलाईन पद्धतीने अर्ज व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी पुढीलप्रमाणे कालावधी उपलब्ध असेल. |

| अ.क्र. | तपशील | दिनांक / वेळ |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी लिंक सुरू होण्याचा दिनांक व वेळ | दि.०५/०१/२०२६ |
| २ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठी व ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यासाठी अंतिम दिनांक व वेळ | दि.०४/०२/२०२६<br>वेळ रात्री ११.५५ वाजेपर्यंत |

- ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पद्धतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन शुल्क भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील, ऑनलाईन परीक्षेच्यावेळी सदर ई-पावतीची छायांकीत प्रत प्रवेशासोबत सादर करणे आवश्यक आहे.
- परीक्षा शुल्क ना परतावा (Non Refundable) आहे.
- कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास उमेदवारास पदभरती शुल्क परत करण्यात येणार नाही.

| | |
|---|---|
| १०.४ | अर्जात हेतूपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या नोंदीत अनधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन करणे, परीक्षेच्या वेळी नक्कल (Copy) करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणाऱ्या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ठ किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा.महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना राहतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी/शर्ती पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. तसेच निवड झाल्यानंतर देखील सेवा समाप्तीस पात्र ठरेल. |
| १०.५ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक (SSC) परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. |
| १०.६ | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजण्यात येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १०.७ | गुणांऐवजी श्रेणी पद्धत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी. |
| १०.८ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रकिया खालीलप्रमाणे आहे.<br>१. प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.<br>२. अर्ज सादरीकरण.<br>३. शुल्क भरणा. |
| १०.९ | **प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**<br>1. www.nmmc.gov.on या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नाव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉन-इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पुर्ण करावी.<br>2. प्रोफाईलद्वारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच वैध ई-मेल आयडी, वैध मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.<br>3. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्यामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.<br>4. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:चा Login व Password द्वारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. संदर्भातील तपशीलाची अचुक नोंद करावी.<br>**5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-**<br>नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी ३.५ सें.मी. X ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :-<br>१) एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो सांक्षांकित करु नये. वरील सुचनांनूसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा. स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.<br>२) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.<br>फोटो रुंदी ३.५ सें.मी.<br>फोटो उंची ४.५ सें.मी.<br>३) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परीक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.<br>४) विहित आकार/क्षमतेप्रमाणे काळ्या शाईच्या (बॉल) पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी. उमेदवाराने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| | ५) वरीलप्रमाणे विहित आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठे अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये<br>६) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र / हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्यावेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल,अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |
| १०.१० | **अर्ज नोंदणी**<br>१. www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर जाऊन APPLY ONLINE या पर्यायावर क्लिक करा जे एक नवीन स्क्रिन उघडेल.<br>२. अर्ज नोंदणी करण्यासाठी नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ईमेल-आयडी प्रविष्ठ करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रिनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोदंणी क्रमांक आणि पासवर्ड दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.<br>३. जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरु शकत नसेल, तर तो सेव्ह आणि नेक्स्ट टॅब निवडून आधीच एंटर केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापुर्वी उमेदवार ऑनलाईन अर्जातील केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांना ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी सेव्ह आणि नेक्स्ट सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि आवश्यक असल्यास त्यात बदल करावा. दृष्टीहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिम सबमिशन करण्यापूर्वी ते बरोबर असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करुन घ्यावी.<br>४. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशील काळजीपुर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी करावी, कारण पूर्ण नोंदणी बटणावर क्लिक केल्यानंतर कोणताही बदल शक्य होणार नाही/करणे शक्य होणार नाही.<br>५. उमेदवाराचे नाव किंवा त्याचे /तिचे वडील/पती इ.चे नाव अर्जामध्ये बरोबर लिहिलेले असावे जसे ते प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळख पुराव्यामध्ये दिसते. कोणताही बदल/तफावत आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.<br>६. तुमचे तपशील सत्यापित करा आणि जतन करा आणि पुढील बटणावर क्लिक करुन तुमचा अर्ज जतन करा.<br>७. फोटो आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक तत्वामध्ये दिलेल्या वैशिष्ट्यानूसार उमेदवाराने फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यवाही करावी.<br>८. नोंदणीपूर्वी संपूर्ण अर्जाचे पुर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी पुर्वावलोकन टॅबवर क्लिक करा.<br>९. आवश्यक असल्यास तपशील सुधारावा आणि छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच नोंदणी पुर्ण वर क्लिक करा.<br>१०. पेमेंट टॅबवर क्लिक करा आणि पेमेंटसाठी पुढे जावे व सबमिट बटणावर क्लिक करावे. |

| | |
|---|---|
| १०.११ | **<u>परीक्षा शुल्क भरणे</u> :-**<br>➢ ऑनलॉईन मोड :-<br>१. डेबिट कार्ड (RuPay / Visa / Master Card / Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्डस / मोबाईल वॉलेट वापरुन पेमेंट केले जाऊ शकते.<br>२. व्यवहार यशस्वीरित्या पुर्ण झाल्यावर एक ई-पावती तयार होईल.<br>३. ई-पावती तयार न होणे अयशस्वी फी प्रदान दर्शविते.<br>४. उमेदवारांनी ई-पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआऊट घेणे आवश्यक आहे. |
| १०.१२ | ➢ **स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे**<br>ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराने खाली दिलेल्या वैशिष्ट्यांनुसार त्याचा/तिचा फोटो, स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.<br>❖ **छायाचित्र प्रतिमा : (4.5 cmx3.5cm)**<br>• छायाचित्र अलीकडील पासपोर्ट शैलीचे रंगीत चित्र असणे आवश्यक आहे.<br>• हलक्या रंगाच्या, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीच्या विरुद्ध घेतलेले असावे.<br>• टोपी आणि गडद चष्मा स्वीकार्य नाहीत.<br>• परिमाण २०० x २३० पिक्सेल (प्राधान्य).<br>• फाईलचा आकार २०KB-५०KB दरम्यान असावा.<br>• स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०KB पेक्षा जास्त नसावा.<br>• ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>• संबधित क्लिकवर क्लिक करा. छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा.<br>• तुमचा फोटो, स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणकृत होणार नाही.<br>• छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>• उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहीजे की छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर ते योग्य आकाराचे व सुस्पष्ट दिसले पाहीजेत तसेच ते योग्य रित्या अपलोड झालेले आहेत. |
| १०.१३ | ➢ **<u>स्वाक्षरी</u>**<br>• अर्जदाराने काळ्या शाईच्या पेनने पांढऱ्या कागदावर सही करावी<br>• परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्य)<br>• फाइलचा आकार १० KB – २०KB दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०KB पेक्षा जास्त नाही याची खात्री करा |
| १०,१४ | ➢ **<u>कागदपत्रे स्कॅन करणे</u>**<br>• स्कॅनर रेझोल्यूशन किमान २०० dpi वर सेट करा.<br>• रंग true colour सेट करा. |

| | |
|---|---|
| १०.१५ | ❖ **<u>कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया</u> :-**<br>• ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.<br>• संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड करा ".<br>❖ तुमचा फोटो, स्वाक्षरी, अपलोड केल्याशिवाय तुमचा ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत होणार नाही.<br>१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.<br>२. ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे.<br>३. उमेदवाराने हे सुनिश्चित केले पाहिजे की अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचा आहे आणि चेहरा स्पष्टपणे दिसला पाहिजे.<br>**<u>टीप</u> :-**<br>ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रिंटआउट घ्यावी. |
| १०.१६ | **<u>अर्ज सादरीकरण</u> :-**<br>१. सदर अर्ज नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in संकेतस्थळावर दिनांक ०५/०१/२०२६ रोजी पासून भरणेसाठी उपलब्ध होतील.<br>२. कृपया लक्षात घ्या की, उमेदवारांनी परीक्षा शुल्क दिलेल्या पेमेंट गेटवे द्वारे ऑनलाईन पद्धतीने अदा करावे. |
| १०.१७ | **<u>परीक्षा शुल्क</u> :-**<br>१. खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी रु. १०००/-<br>२. **मागासवर्गीय, अनाथ, दिव्यांग, आर्थिक दुर्बल घटक** उमेदवारांसाठी रु. ९००/-<br>३. परीक्षा शुल्क फक्त ऑनलाईन पद्धतीनेच भरणा करण्यात यावे.<br>४. उमेदवारास प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचे असल्यास अशा प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील.<br>५. परीक्षा शुल्क ना परतावा (Non-Refundable) आहे. |
| १०.१८ | वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे याशिवाय दुसऱ्या पद्धतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील. |
| १०.१९ | उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, सामाजिक प्रवर्ग, कोणत्या प्रवर्गातून अर्ज करु इच्छित आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी इ. माहिती काळजीपुर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास नवी मुंबई महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. |
| १०.२० | उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी ही त्याच्या प्रवेशपत्रावर / उपस्थिती पत्रकावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अर्जावर अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी. |
| १०.२१ | ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारास प्राथमिक छाननीच्या आधारे परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल त्यामुळे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा. |

| | |
|---|---|
| १०.२२ | भरती प्रक्रियेच्या संदर्भातील सर्व माहिती व त्यानुषंगाने होणाऱ्या बदलाबाबतची सर्व माहिती केवळ नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल. यात्यतिरिक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रकियेची माहिती उपलब्ध होणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| १०.२३ | विहित दिनांकानंतर व विहित वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही. |
| १०.२४ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग / क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव पात्रता इ. संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे / निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा नंतर विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |
| १०.२५ | ज्या उमेदवारांनी यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण / आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी / जिल्हा सैनिक बोर्ड / अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे, अशा उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालिन उमेदवार यांनी देखील स्वंतत्ररित्या अर्ज सादर करणे आवश्यक राहील. |

## ११. परीक्षा :

| | |
|---|---|
| ११.१ | जाहिरातीत नमूद पदाकरिता अर्ज केलेल्या परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर परीक्षेच्या किमान 7 (सात) दिवस अगोदर त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी परीक्षा प्रवेशपत्र स्वतः संकेतस्थळावरून काढून घ्यावे.<br>• परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्राची प्रिंट व ओळखीचा पुरावा (छायाप्रतीसह) सोबत ठेवणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेनंतर प्रस्तुत प्रवेशपत्र स्वत:जवळ जपून ठेवावे व परीक्षा कक्षात प्रवेश पत्र व ओळखीच्या पुराव्याची छायाप्रत जमा करावी.<br>• **परीक्षा केंद्राची शहरे उपलब्धतेनूसार निश्चित केली जातील.**<br>• **"परीक्षा केंद्र प्रवेश पत्रावर ठरवून दिलेप्रमाणे असतील. अर्जदाराने मागणी केलेल्या केंद्राव्यतिरिक्त अन्य/नवीन केंद्र दिले जाऊ शकते. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही".** |
| ११.२ | दिव्यांग उमेदवार :- लेखनिक आणि अथवा अनुग्रह कालावधीबाबत<br>• लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागए क्रमांक: दिव्यांग २०१९/प्र.क्र.२००/दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१ तसेच तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.<br>• उमेदवारास त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वत:च्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल व लेखनिकाकडून परीक्षा नियमांचे उल्लंघन होणार नाही याची जबाबदारी घ्यावी लागेल.<br>• उमेदवाराने नेमलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठी उमेदवार नसावा. प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमाचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांची उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवांसाठी पात्र असलेल्या आणि वापरू इच्छिणा-या उमेदवारांनी काळजीपूर्वक सूचित केले पाहिजे. त्यानंतरची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| | • एका उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करणा-या व्यक्तीस दुस-या उमेदवारासाठी लेखनिक म्हणून काम करता येणार नाही.<br>• लेखनिक कोणत्याही शैक्षणिक प्रवाहातील असू शकतो. तथापि विशेष तज्ञ अधिका-यांच्या पदांसाठी लेखनिक हा त्या पदासाठी विहित केलेल्या शैक्षणिक प्रवाहातील नसावा. तसेच सदर मदतनीसाची शैक्षणिक पात्रता ही उमेदवाराच्या पदाच्या आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या कमीत कमी, एक स्तर कमी असावी.<br>• उमेदवार आणि लेखनिक या दोघानांही उचित हमीपत्र दयावे लागेल की लेखनिकाने वर नमूद केलेल्या लेखनिकांसाठी सर्व विहित पात्रता निकषांची पूर्तता केली आहे. पुढे जर नंतर असे आढळून आले की त्याने/तिने ठरवून दिलेली कोणतीही पात्रता निकष पूर्ण केले नाहीत किंवा भौतिक तथ्ये दडवली आहेत. तर ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची पर्वा न करता, अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• जे उमेदवार लेखनिकाचा वापर करतात ते परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी किंवा अन्यथा सल्ल्यानुसार २० मिनिटांच्या भरपाईच्या वेळेसाठी पात्र असतील.<br>• लेखनिकाने स्वत:हून उत्तर देऊ नये, असे कोणतेही वर्तन आढळल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.<br>• फक्त सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांनाच अशी परवानगी दिली जाईल कारण उमेदवारांना दिलेला सवलतीचा वेळ प्रणालीवर आधारित असेल,जर त्यांनी/तिने त्यासाठी नोंदणी केली नसेल तर चाचणी आयोजित करणा-या यंत्रणेला अशी सवलत देणे शक्य होणार नाही. सवलतीच्या वेळेसाठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांना अशा सवलतीना परवानगी दिली जाणार नाही.<br>• परीक्षेदरम्यान, कोणत्याही टप्प्यावर, लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास, परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. जर चाचणी प्रशासक कर्मचा-यांनी परीक्षेनंतर लिखीत प्रश्नाची स्वतंत्रपणे उत्तरे दिल्याचा अहवाल दिला गेला तर अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.<br>• लोकोमोटर दिव्यांगत्व आणि सेरेब्रल पाल्सी **(locomotor disability and cerebral palsy)**<br>लोकोमोटर दिव्यांगत्व आणि सेरेब्रल पाल्सी असलेल्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे लोकोमोटर डिसॅबिलिटी आणि सेरेब्रल पल्सी बाबत कार्यक्षमता कमी होण्याच्या मर्यादेपर्यंत (किमान ४०% दिव्यांग) असेल अश्या उमेदवारांसाठी प्रति तास वीस मिनिटे सवलतीचा वेळ अनुज्ञेय असेल.<br>• <u>दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक तत्वे.</u><br>• दृष्टिहीन उमेदवार (ज्यांना ४०% पेक्षा कमी दिव्यांगत्व आहे) चाचणीसाठी सामग्री वर्धित (मॅग्निफाईड) फॉन्टमध्ये पाहण्याची निवड करू शकतात आणि असे सर्व उमेदवार प्रत्येक तासासाठी २० मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील.<br>• जे उमेदवार परीक्षेसाठी लेखनिकाची सेवा वापरतात, परीक्षेतील मजकूर आवर्धित फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टिहीन उमेदवारांना ही मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे/स्पष्टीकरण, जर काही असतील, त्यानूसार बदलू शकतात. |
| **११.३** | ज्या उमेदवारांना परीक्षेच्या दिवशी सहाय्यकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना व सर्व अल्पदृष्टी उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल तथापि अशा उमेदवाराने परीक्षेच्या वेळी दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असल्याबाबतचे मूळ प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित छायांकीत प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. |
| **११.४** | लेखी परीक्षेनंतर जरूरी प्रमाणे पात्र उमेदवारांना १:३ या प्रमाणात कागदपत्रे पडताळणीकरीता बोलावण्यात येईल. |
| **११.५** | काही अपरिहार्य कारणास्तव परिक्षेच्या तारखांमध्ये / परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती <u>www.nmmc.gov.in</u> संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. |

| | |
|---|---|
| ११.६ | **<u>ओळख पटवणे</u> :-**<br>परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / शासकीय कर्मचारी ओळखपत्र / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विदयापीठ/ कॉलेजचे फोटोसहीत ओळखपत्र/ बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/ उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाहीत, सदर उमेदवाराचे मुळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.<br><u>टीप :-</u> उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील नाव (परीक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा-या ओळखपत्राशी तंतोतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो असलेले ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.<br>• **रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राहय धरला जाणार नाही.**<br>• निवड प्रक्रिये दरम्यान गैरवर्तणूक / अनुचित प्रकार / गैरप्रकार करताना दोषी आढळलेल्या उमेदवारावर करण्यात येणारी कार्यवाही :- उमेदवाराने त्याच्या हितासाठी खोटी व चुकीची माहिती / तपशिल देवू नये, खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर करू नये किंवा कोणतीही माहिती ऑनलाईन अर्ज भरताना दडवून ठेवू नये. जर उमेदवाराने खोटी माहिती तथा खोटा तपशिल तयार करून सादर केला तर उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व योग्य तो फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| ११.७ | **परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रियेदरम्यान जर उमेदवाराने,**<br>१. अनुचित प्रकार करणे किंवा<br>२. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा,<br>३. परीक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणूक करणे किंवा परीक्षेच्या पेपरमधील माहिती किंवा तत्सबंधी काही माहिती कोणत्याही कारणासाठी पूर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रानिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा,<br>४. स्वत:च्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पद्धतीचा अवलंब करणे किंवा,<br>५. स्वत:च्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठिंबा मिळविणे किंवा,<br>६. दळणवळणाची भ्रमणध्वनी किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परीक्षेच्या ठिकाणी करणे,<br>७. परीक्षा कक्षातील परीक्षा नियंत्रण अधिकारी याच्याशी अरेरावी करणे उद्धटपणे वागणे त्यांना लाच देऊ पाहणे. |

| | |
|---|---|
| | <u>अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारास फौजदारी कार्यवाहीस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारास परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल.</u><br>१. नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे पुढील कालावधीत घेण्यात येणा-या कोणत्याही परीक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल.<br>२. जर उमेदवार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल. |

**१२. परीक्षा केंद्राविषयी नियमावली :-**

| | |
|---|---|
| १२.१ | १. प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षा केंद्रावर **"ऑनलाईन"** पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.<br>२. परीक्षा केंद्र, परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ व सत्र इत्यादी बाबत बदलाची विनंती मान्य केली जाणार नाही.<br>३. महापालिकेस परीक्षा केंद्र रद्द अथवा नवीन केंद्र समाविष्ट इत्यादी बाबतचे अंतिम अधिकार असतील.<br>४. महापालिकेस उमेदवाराने मागणी केलेल्या परीक्षा केंद्र व्यतिरिक्त केंद्र देण्याचा अधिकार असेल.<br>५. उमेदवारांनी आपल्या जबाबदारीवर स्वखर्चाने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे या संबंधात कोणत्याही प्रकारच्या हानी/नुकसानीस महापालिका जबाबदार राहणार नाही.<br>६. एखादया परीक्षा केंद्रावर पुरेसे उमेदवार **"ऑनलाईन"** परीक्षेसाठी उपस्थित न राहिल्यास किंवा केंद्रावर क्षमतेपेक्षा अधिक उमेदवार झाल्यास महापालिकेस उमेदवाराचे परीक्षा केंद्र बदलण्याचा अधिकार असेल.<br>७. परीक्षेच्यावेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा परीसरात भ्रमणध्वनी, गणकयंत्र (Calculator), आयपॅड तत्सम इलेक्ट्रानिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधण वापरण्यास सक्त मनाई असेल. |

**१३. परीक्षेला उशिरा येण्याबाबत.:-**

| | |
|---|---|
| १३.१ | परीक्षेच्या प्रवेशपत्रात परीक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परीक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळी ही प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या आधीची असणार आहे. परीक्षेची वेळ जरी दोन तास (१२० मिनिटे) असली तरी, उमेदवारांना विविध प्राथमिक औपचारीकता पुर्ण करण्यासाठी जसे की- सूचना देणे, ओळख पटवणे, आवश्यक विविध कागदपत्रांची पडताळणी, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, इत्यादी, बाबींच्या पुर्ततेसाठी प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेच्या सुमारे १ तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. परीक्षेच्या ३० मिनिटे आधी परिक्षा केंद्रावरील प्रवेश बंद करण्यात येणार असल्यामुळे, त्यानंतर येणा-या उमेदवारांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही. |

**14. कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर करणे.**

सदर परीक्षेच्या निकालानंतर अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनूसार खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| **कागदपत्रे / प्रमाणपत्रे** |
|---|
| अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणा पत्र |
| शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे |
| वयाचा पुरावा |
| सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा |
| आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र (अज प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक) |
| वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र |
| पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| खेळाडूसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| अराखीव महिला, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन |
| महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (डोमिसाईल) |
| पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र (शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार) |
| शासन निर्णय मानंम २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.४/०२/२०१३ मध्ये नमूद प्रमाणे MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र |
| भूकंपग्रस्त प्रमाणपत्र |

## १५. इतर सर्वसाधारण अटी/शर्ती/सूचना :

| | |
|---|---|
| १५.१ | उमेदवार हा भारताचा नागरिक असावा. आणि महाराष्टात १५ वर्षे अधिवास (Domicile) करीत असल्याबाबतचे त्याने सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र (तहसिलदार यांचे कार्यालयाकडील) उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे. तसाच अर्थ असेल. |
| १५.२ | जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम, २००० मधील तरतुदीनूसार सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १५.३ | विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गाचा दावा करणा-या (या प्रवर्गातील महिला, खेळाडू, माजी सैनिक, अपंग, अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा-या) उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १५.४ | उमेदवारांना परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवाराची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त निवड सूची, अंतिम निवड व इतर सर्व सूचना हया वेळोवेळी www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामूळे उमेदवारांनी भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही. |
| १५.५ | उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतूदी नवी मुंबई महानगरपालिकेकडून कोणत्याही क्षणी पूर्वलक्षी प्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनूसार निर्देशनास आणण्यात येतील व ते संबंधितांवर बंधनकारक असतील. असे बदल नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. त्याकरीता उमेदवाराने दररोज नवी मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळाचे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील |
| १५.६ | पदाकरीता शासनाकडील किंवा खाजगी कंपनीकडील उमेदवाराने सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल, उदा.निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. |
| १५.७ | निवड प्रक्रिया सुरू झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्देशनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. |
| १५.८ | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवाराने विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इ. विशिष्ट स्वरूपात भरून दिल्याशिवाय महानगरपालिका सेवेत रूजू करून घेतले जाणार नाही. |

| | |
|---|---|
| १५.९ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| १५.१० | निवड झाल्यास उमेदवारास रू. ५००/- च्या मुद्रांक पेपरवर नोटरी समोर आवेदनापत्रात नमूद केलेल्या माहितीच्या अचूकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र नियुक्तीपूर्वी सादर करावे लागतील. |
| १५.११ | महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय उमेदवारांवर बंधनकारक असतील. |
| १५.१२ | परीक्षेसाठी उपस्थित राहणा-या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देय राहणार नाही. |
| १५.१३ | उमेदवारांनी अर्ज करण्याच्या दिनांकास सेवा प्रवेश नियमावलीतील तरतुदीनूसार शैक्षणिक अर्हता धारण करणे अनिवार्य आहे. |
| १५.१४ | निवड झालेल्या उमेदवाराला नियमीत तत्वावर नियुक्तीनंतर नवी मुंबई महानगरपालिका सेवा विनियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू होतील. |
| १५.१५ | उपरोक्त पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांनी MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे किंवा समकक्ष अर्हता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र शासन माहिती व तंत्रज्ञान (मा.प्र.वि.) विभाग, शासन निर्णय क्र.मानस २०१२/प्र.क्र.२७७/३९/, दि.०४/०२/२०१३ व शासन निर्णय क्र.मातम २०१२/प्र.क्र. २७७/३९, दि.१६/०७/२०१८ मध्ये विहीत केलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. |
| १५.१६ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ, दि,२८ ऑगस्ट, २०१७ अन्वये उमेदवाराची नियुक्तीपश्चात चारित्र्य पडताळणीबाबतची कार्यवाही सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे. चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल समाधानकारक असल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र कायमस्वरूपी नियुक्तीस पात्र ठरेल. |
| १५.१७ | सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडील आदेश क्र.एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्र.१७/२०००/२०१२, दि.०१/०७/२००५ नूसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे बंधनकारक राहील. |
| १५.१८ | उपरोक्त पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची वैदयकीय अधिक्षक, सार्वजनिक रूग्णालय, वाशी यांच्याकडून वैदयकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैदयकीय दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. |
| १५.१९ | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यास मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे. |
| १५.२० | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागु राहील. |
| १५.२१ | उपरोक्त पदाकरीता नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणुकीच्या मुळ दिनांकापासून एक/दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. तसेच अशा उमेदवारांचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब आणि तत्संबंधी कारणे नमूद करून परिविक्षाधीन कालावधी ६ महिने वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर कर्मचारी/अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात येईल. |

१६. इतर

| | |
|---|---|
| **१६.१** | परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या निर्माण झाल्यास समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील मात्र पुन्हा चाचणीसाठी उमेदवारांचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही. समस्या निराकरण करण्याच्या प्रक्रियेत जाण्यास इच्छुक नसलेले किंवा सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार प्रक्रियेतून नाकारले जातील |
| **१६.२** | भरतीशी संबंधीत सर्व बाबींमध्ये मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारावर बंधनकारक असेल या संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेव्दारे कोणताही वैयक्तिक पत्रव्यवहार अथवा चौकशी केली जाणार नाही. |
| **१६.३** | परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात घेतल्यास, सत्रामध्ये वापरल्या जाणा-या वेगवेगळया चाचणीच्या काठीण्य पातळीतील किंचित फरक समायोजित करण्यासाठी विविध संचामधील गुणांकन समतुल्य केले जातील. केंद्राची क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास एकापेक्षा जास्त सत्रे आवश्यक राहतील. |
| **१६.४** | **सामान्यीकरण प्रक्रिया (Normalisation Method)**<br>एकाच दिवशी, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये किंवा अनेक दिवसांत, एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये परीक्षा घ्यावी लागली तर परीक्षेचा प्रथम दिवस ते अंतिम दिवस तसेच सत्र ०१ ते अंतिम सत्र याबाबत "**सामान्यीकरण प्रक्रिया**" (Normalisation Method) करण्यात येईल. |
| **१६.५** | **Groupwise Time Setter**<br>बहुपर्यायी वस्तुनिष्ठ ऑनलाईन परीक्षेमध्ये प्रत्येक विषयामधील सोपे, मध्यम व कठीण प्रश्न, गटामध्ये अंतर्भूत करून त्यानुसार प्रत्येक गटासाठी वेळ निश्चित करून त्याप्रमाणे परीक्षेमध्ये "ग्रुप लेवल टायमरची" अंमलबजावणी करण्यात येईल. |
| **१६.६** | महापालिका वैयक्तिक उमेदवारांनी नोंदविलेल्या उत्तरांचे विश्लेषण इतर उमेदवारांच्या बरोबर आणि चुकीच्या उत्तरांच्या मधील समानता शोधण्यासाठी करेल. या संदर्भात महापालिकेद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत उत्तरे सामायिक केली गेली आहेत आणि मिळालेले गुण वैध नाहीत असा निष्कर्ष काढला गेला असेल, तर महापालिका संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत असून अशा अपात्र उमेदवारांचे निकाल रोखले जातील. |
| **१६.७** | निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती प्रदान करणे आणि/किंवा प्रक्रियेचे उल्लंघन केल्याच्या घटनांमुळे उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला भविष्यात कोणत्याही महापालिकेच्या भरती प्रक्रियेस उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही. अशी अपात्रता, नंतर आढळून आल्यास पूर्वलक्षी प्रभावाने उमेदवार अपात्र होईल. |
| **१६.८** | जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक किंवा तदनुषंगिक अर्हता अर्ज सादर करतेवेळी उमदेवाराने धारण करणे अनिवार्य आहे. |

**१७. कर्तव्ये व जबाबदा-या :**

| | |
|---|---|
| **१७.१** | उपरोक्त पदावरील अधिकाऱ्यास/कर्मचा-यास जी कर्तव्ये पार पाडण्याचे त्यांना निदेश देण्यात येतील, ती कर्तव्ये आणि जबाबदा-या पार पाडण्याचे महानगरपालिकेकडून फर्मावण्यात येईल, अशी अन्य कर्तव्ये पार पाडावी लागतील, मा. महापालिका आयुक्त व खाते प्रमुख यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करून कर्तव्य पार पाडावे लागेल. |

**१८. विशेष सूचना :**

| | |
|---|---|
| **१८.१** | महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे /अभिलेखे ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व शासकीय नियमानुसार वापरण्यात येतील. |
| **१८.२** | जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल." |
| **१८.३** | मध्यस्थ / ठग / नवी मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सूचना देण्यात येत आहेत. |
| **१८.४** | यापूर्वी सदर पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी या जाहिरातीस अनुसरून पुन्हा नव्याने अर्ज करणे आवश्यक आहे. |
| **१८.५** | परीक्षेची वेळ, दिनांक, ठिकाण, परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) याबाबत वेळोवेळी नवी मंबई महानगरपालिका संकेतस्थळावर कळविण्यात येईल, याबाबतची दक्षता स्वत: उमेदवाराने घेणे आवश्यक आहे. |
| **१८.६** | प्राप्त अर्जाची संख्या लक्षात घेता परीक्षेची वेळ, दिनांक व ठिकाण यामध्ये बदल होऊ शकतो. याबाबत अर्जदारांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |
| **१८.७** | उपरोक्त पदाच्या भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित, रद्द किंवा काही बदल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी त्यांचेकडे राखून ठेवले आहेत. |

**(डॉ.कैलास शिंदे)**
**महापालिका आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**स्थळ :- सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.**
**दिनाक :- १३/१२/२०२५.**